# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## जनसंपर्क अधिकारी यांचे कार्यालय

प्रकाशगड, २रा माळा, प्लॉट क्र. जी-९, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
**दूरध्वनी क्र.** : ०२२ - ६९८५ ३५१२ । **ई-मेल** : apro@mahagenco.in, pro@mahagenco.in

क्र. : महानिर्मिती/का.सं.(सां.नि. व सु.)/जनसंपर्क/वृत्तपत्रीय टिप्पणी/१८१ दि. : ०७/०६/२०२५.

**-: वृत्तपत्रीय टिप्पणी :-**

**"कुशल मनुष्यबळ हेच महानिर्मितीचे बलस्थान" - राधाकृष्णन बी. (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक)**
**"भविष्यातील आव्हानांना संधींमध्ये रुपांतर करण्यासाठी सिद्ध व्हा"**
**- विश्वास पाठक (संचालक-स्वतंत्र), महानिर्मिती**

**(मुंबई, दि. ७ जून २०२५) :** गतकाळातील कार्याचा आढावा घेत नवे संकल्प करण्याचा आजचा दिवस असून राज्याच्या भविष्यातील विजेची गरज पूर्ण करण्याकरता कार्यक्षमता वृद्धी आणि तंत्रकुशल होणे गरजचे आहे. माननीय मुख्यमंत्री यांचे नेतृत्वामध्ये अपारंपारिक ऊर्जा प्रकल्प गतीने पुर्ण करण्यास महानिर्मिती प्राधान्य देत असून महानिर्मितीचे व्हिजन २०३५ द्वारे आपण शाश्वत हरित ऊर्जेच्या दिशेने प्रवास करत असल्याचे प्रतिपादन, राधाकृष्णन बी., अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महानिर्मिती यांनी केले. ते महानिर्मितीच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त रंगशारदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राधाकृष्णन बी., अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महानिर्मिती यांनी भूषविले तर मंचावर मराविमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (संवसु-१) पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक (पर्यावरण आणि सुरक्षा) डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (प्रकल्प) विवेक रोकडे प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीला उदंचन जल विद्युत प्रकल्प, इतर अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे क्षमता वाढ करतांना अत्यंत अभ्यासपूर्ण, नियोजनबद्ध आणि गतिमानतेने निर्धारित लक्ष्य गाठावे लागणार आहे. त्यायोगे, प्रत्येकाचे योगदान अपेक्षित असल्याचे राधाकृष्ण बी. यांनी सांगितले.

मरावीमं सुत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक म्हणाले की, स्पर्धात्मक दरामध्ये वीज निर्मिती करताना प्रत्येक कर्मचाऱ्याने तत्पर राहणे गरजेचे आहे. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे भारताला ५ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविणे तसेच राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांचे राज्याला १ ट्रिलियन अर्थव्यवस्था बनविण्याच्या संकल्पामध्ये वीज क्षेत्राचे योगदान महत्वाचे असणार आहे.

संचालक (वित्त) बाळासाहेब थिटे यांनी सांगितले की, "महानिर्मिती नफ्यात कशी राहील याचा ध्यास प्रत्येकाने घेणे आवश्यक असून महानिर्मितीच्या दोन दशकांच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये प्रत्येक कर्मचाऱ्याचे अमूल्य योगदान आहे. महानिर्मितीच्या वित्त विभागाने आर्थिक शिस्तीसह उत्तम वित्तीय नियोजन साध्य केल्याचे त्यांनी सांगितले.

संचालक (संचलन) संजय मारुडकर म्हणाले की, वीज नियामक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांना अनुरूप वीज निर्मिती करण्याकरता प्रत्येक संचाचे संचलन करणे गरजेचे आहे. वीज क्षेत्रामधील स्पर्धा पाहता प्रत्येकाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

संचालक (प्रकल्प) अभय हरणे यांनी सांगितले की, महानिर्मितीने महत्वाकांक्षी स्थापित क्षमता वाढीचा आराखडा तयार केला असून पर्यावरणपूरक अपारंपारिक ऊर्जा निर्मिती करताना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय आस्थापना सोबत सामंजस्य करार केले आहेत. निर्धारित वेळेमध्ये प्रकल्प उभारणी करण्यास महानिर्मिती व्यवस्थापन प्राधान्य देत असून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

जनसंपर्क विभागाच्या समन्वयातून महानिर्मितीच्या सर्वंकष कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या चित्रफितीने वातावरण ऊर्जामय झाले. राज्यातील सर्व वीज निर्मिती केंद्रामधील उत्कृष्ट कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांचा मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच संचालक यांचे हस्ते यथोचित गौरव करण्यात आला, याप्रसंगी मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक, समकक्ष अधिकारी, विभाग प्रमुख, अधिकारी-अभियंते-कर्मचारी आणि कुटुंबीय तसेच कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन संतोष पुरोहित यांनी तर उपस्थितांचे आभार आनंद कोंत यांनी केले. पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचलन पुरुषोत्तम वारजूरकर यांनी केले.  मुख्यालय आयोजन समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

महानिर्मितीच्या मुख्यालय येथील कर्मचारी यांनी सादर केलेल्या दर्जेदार सांगीतिक कार्यक्रमाने वर्धापन दिन सोहळ्याची सांगता झाली.

******













